# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते
**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी
**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ४०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०-२४४७४२९५
ई-मेल : sci.vibha@gmail.com



या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.


## नवीन शैक्षणिक वर्ष, नवीन शैक्षणिक धोरण

जून महिना म्हणजे, नेमेचि येणारा पावसाळा आणि शाळा सुरू होण्याची लगभग दोन्ही नजरेसमोर येतात, उत्सुकता असते ती यंदा किती व कसा पाऊस पडेल याच्या अंदाजाची तसेच नवीन पाठ्यपुस्तके कशी असतील याची, यंदाच्या पावसाचा प्राथमिक अंदाज भारतीय हवामान खाते यांनी व स्कायमेट या खाजगी संस्थेने वर्तवला आहे. या दोन्ही अंदाजात असलेली तफावत ही चिंतेची बाब आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा देशात गेल्या चार वर्षांप्रमाणेच सरासरी एवढा पाऊस पडेल. त्यातही उत्तरभारताचा बहुतांश भाग व मध्य भारत या प्रदेशांत सरासरी एवढा वा अधिक पाऊस असेल, तर उर्वरित भारतात सरासरीपेक्षा थोड्या कमी पावसाचा अंदाज आहे. स्कायमेट च्या अंदाजाप्रमाणे मात्र यंदा भारतात सरासरीपेक्षा पाच टक्के कमी पाऊस असेल, एल निनोच्या पुनरागमनामुळे अशी शक्यता वर्तवली गेली आहे. गेल्या चार वर्षात पाऊस सरासरी एवढा वा थोडा जास्तच होता तो 'ला निनां' च्या प्रभावाने असे स्कायमेटला वाटते. आता 'ला निना' संपुष्टात आला असून एल निनोचे वर्चस्व असण्याची शक्यता वर्तवली गेली आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाऊसमान कसे असेल याला अनन्य साधारण महत्त्व आहे. अगोदरच एप्रिल महिन्यातील अवकाळी पाऊस व गारपीट यांनी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. त्यामुळे पुढच्या मोसमाच्या अंदाजाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. भारतीय उपखंडातील परिस्थिती पावसाचा अचूक अंदाज वर्तविण्यासाठी अनुकूल नाही व त्यामुळे अंदाज चुकण्याची शक्यता अधिक असते हे मान्य केले तरी भारतीय हवामान खाते व स्कायमेट यांच्या अंदाजात मोठा फरक कशामुळे पडतो, यावर प्रभावी संशोधन होणे आवश्यक आहे.

युवा भारतीय संशोधक हा विषय हातात घेतील व तो यशस्वीरित्या सोडवितील अशी मला खात्री आहे.

शाळांबाबत यावर्षी खूपच उत्साहवर्धक परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील


SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Offset, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

शाळा या वर्षी १५ जूनपासून सुरू होतील असे शालेय शिक्षण मंत्र्यांनी घोषित केले आहे. यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी २०२३–२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु होणार आहे. जून २०२३ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षात तांत्रिक शिक्षण व इंजिनिअरिंगचे शिक्षण मराठी भाषेमधून दिले जाणार आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या मुलांना याचा लाभ मिळणार आहे. पुढे वैद्यकीय शिक्षण देखील मराठी भाषेत देण्याबाबत विचार सुरु आहे. केवळ महाराष्ट्रामध्ये नाही तर संपूर्ण भारतात ही क्रांती घडत आहे. या क्रांतीचे प्रणेते हे आदरणीय पंतप्रधान आहेत असेही शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा अंतिम मसुदा केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने एप्रिल २०२३ रोजी जाहीर केला आहे. एवढेच नव्हे तर हा मसुदा निर्दोष व्हावा यासाठी शिक्षण मंत्रालयाने तज्ञ व्यक्तिकडून अभिप्राय सूचना व शिफारसीही मागवल्या आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नवीन संरचना ५+३+३+४ अशी असणार आहे. या धोरणातील पहिल्या ५ वर्षामध्ये पूर्वप्राथमिक, पहिली व दुसरी या इयत्तांचा समावेश असणार आहे. पुढील तीन वर्षात तिसरी ते पाचवी हा शैक्षणिक स्तर असेल तर त्यापुढील स्तर सहावी ते आठवी असणार आहे. शेवटची चार वर्षे ही नववी ते बारावी अशा पद्धतीने ही चार स्तरातील विभागणी असणार आहे.

पूर्वीच्या अभ्यासक्रमातील पाठांतराचे ओझे कमी करून, आता खेळ, कृती व शोध आधारित अभ्यासक्रम असणार आहे. त्याचप्रमाणे संबोध, आकलन, उपयोजनावर भर, गणिती दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशील विचार, चिंतनशील विचार, सहसंबंधात्मक अध्ययन, संवाद कौशल्य यावर भर असेल.

केवळ पाठांतर करून परीक्षेत मिळणाऱ्या गुणांचे अवास्तव महत्व कमी करून कौशल्य व क्षमता विकसनावर भर देण्यात येत आहे. अध्ययन निष्पत्तीच्या आधारे मुलांची गुणवत्ता तपासली जाणार आहे. केवळ गुण न नोंदविता क्षमता व कौशल्य विकसनाची स्थिती प्रगती पुस्तकात नोंदवून सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेला चालना दिली जाणार आहे.

अजून एक मोठा बदल म्हणजे बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य दिले जाणार आहे. शिक्षण क्षेत्राचा चेहरामोहराच या धोरणामुळे बदलला जाणार आहे. राज्यात उच्च शिक्षणात पुढील वर्षापासून हे धोरण लागू करण्याची तयारी करण्यात आली आहे. यामुळे शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष ते पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार करण्याच्या हालचाली विद्यापीठ पातळीवर सुरु आहेत.

मानवी क्षमतेचा संपूर्ण विकास करण्यासाठी आणि संपूर्ण मानवी समता साध्य करण्यासाठी तसेच न्याय व समानतेने सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षण हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. राष्ट्रीय विकासाला चालना तसेच सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी सार्वत्रिक दर्जेदार शिक्षण उपलब्ध करणे आवश्यक आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाने हे निश्चित साध्य होईल.

**रमेश दाते**
sci.vibha@gmail.com

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा ऑफसेट, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८. येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२. येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते